महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७८/६३/३२
ईमेल--desk12@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**कार्यालयीन आदेश**

क्रमांक : १२/आस्था/बदल्या/प्रोग्रामर/२०२३/ ४३४.
दिनांक - 3 1 MAY 2023

संदर्भ : १. महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५.
२. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एसव्हीआर-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ , दिनांक ०९.०४.२०१८.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२२/प्र.क्र.३२३)/मशि-१, दिनांक -२५.०५.२०२३

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन व वरील संदर्भ क्रमांक १ ते ३ मधील सूचना व तरतूदी विचारात घेवून संचालनालय स्तरावर घेण्यांत आलेल्या नागरी सेवा मंडळाच्या बैठकीच्या शिफारशीनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील **संस्था / कार्यालयात कार्यरत गट क मधील प्रोग्रामर या राज्यस्तरीय** पदावरील खालील कर्मचाऱ्यांच्या सदर अधिनियमातील कलम ३ (१) मधील तरतुदीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व सध्याचे कार्यरत ठिकाण | बदली नंतरचे पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुबोध रामराव वानखडे, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | श्री.किशोर माणिकराव आंबटकर, शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर | प्रशासकीय बदली |
| २ | श्री.किशोर माणिकराव आंबटकर, शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | श्री. सुबोध रामराव वानखडे, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर | विनंती बदली |

२. सदर बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता सर्व नियंत्रक अधिकारी यांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(१) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यावर सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी पर्यायी कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस दिनांक १५ जून २०२३ (म.नं.) पर्यंत कार्यमुक्त करावे.

(२) बदली झालेले कर्मचारी त्यांच्या पूर्वीच्या पदस्थापनेच्या ठिकाणाहून कार्यमुक्त होवून रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या कर्मचाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित नियंत्रक अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात येईल.

(३) बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

(४) सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे दिनांक १५ जून २०२३ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेने / कार्यालयाने काढावे. दिनांक १६ जून २०२३ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या संस्थेकडून / कार्यालयाकडून काढण्यात येवू नये. सदर वेतन संबंधित कर्मचारी बदलीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर बदलीनंतरच्या संस्थेने / कार्यालयाने काढावे व तसा अहवाल या संचालनालयास सादर करावा. दिनांक १६ जून २०२३ पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील / कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल.

३. उपरोक्त आदेशातील विनंती बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यास बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही आणि उपरोक्तपैकी ज्या कर्मचा-याची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यांत आली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय/उपकोषागार कार्यालय, अमरावती/खामगाव (मानार्थ) (संबंधित संस्था /कार्यालय प्रमुखांगार्फत)

त्यांना कळविण्यांत येते की, सदर आदेशान्वये बदल्या केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे दिनांक १५ जून, २०२३ पर्यंतचे वेतन सध्या कार्यरत असलेल्या संस्थेमार्फत / कार्यालयामार्फत अदा करावयाचे आहे. दिनांक १६ जून, २०२३ पासूनचे वेतन बदली झालेल्या संस्थेमार्फत / कार्यालयामार्फत अदा करावयाचे आहे.

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

त्यांना कळविण्यांत येते की, सदर बदल्या कार्यान्वीत करण्यासाठी त्यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करुन एकत्रित अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करावा.

४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/खामगाव

आपणांस कळविण्यांत येते की, संबंधित कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यांत यावे / बदलीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यांत यावे. दिनांक १६ जून, २०२३ नंतर संबंधित कर्मचाऱ्यांना बदलीपूर्वीच्या ठिकाणावरुन त्यांचे वेतन अथवा कोणतीही देयके अदा करु नये.

५. संबंधित कर्मचारी. (संबंधित कार्यालय / संस्था प्रमुखांमार्फत) आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

६. कार्यासन क्र. १२, मुख्य कार्यालय, मुंबई ( निवड नस्ती)